भारतीय संविधान अनुच्छेद २७५(१) योजने अंतर्गत मंजूर "Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashram schools" या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र.४३ /का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ३१/०८/२०१९

संदर्भ-

१.जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९
२.आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१९/प्र.क्र.६३/ का.१९, दिनांक २९/०६/२०१९ व दि.२३/०७/२०१९

प्रस्तावना-

केंद्र शासनाकडून दरवर्षी विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते . या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी नावीन्यपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय,शासकीय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करून निवडक प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्तावामध्ये आर्ट इंडिया फाउंडेशन यांचा प्रस्तावाचा समावेश आहे . प्रस्ताव मुख्यत्वे राज्यातील निवडक १०० शासकीय आश्रमशाळेतील किमान ५०० शिक्षक/अधिक्षक यांच्यासाठी कला शिक्षणाबाबत अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षण देणेबाबत आहे.

२ आदिवासी विकास विभागामार्फत आश्रमशाळा समूह ही योजना राबविली जाते. राज्यात सद्य स्थितीत ४९१ शासकीय आश्रम शाळा ,२५ एकलव्य मॉडेल निवासी आश्रम शाळा व ११ इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू आहे. ह्या आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कलेचे मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. ह्या विद्यार्थ्यांना आश्रम शाळेच्या स्तरावर कला बाबत मार्गदर्शन मिळाल्यास ते कला क्षेत्रात नावलौकिक करू शकतात. सबब त्यासाठी आश्रम शाळेत असणाऱ्या शिक्षक व अधीक्षक यांच्यासाठी कला बाबत अभ्यासक्रम तयार करून त्यांना प्रशिक्षण दिले तर त्याचा फायदा नक्कीच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना होईल व ते कला क्षेत्रात प्राविण्य मिळवतील ह्या दृष्टीकोनातून आर्ट इंडिया फाउंडेशन यांनी "Art India Foundation- Develop arts curriculum and training of

teachers at Ashram schools" हा रुपये ४९.५० लाख किमतीचा प्रस्ताव राज्यातील १०० शासकीय आश्रम शाळा / एकलव्य मॉडेल निवासी शाळा/ इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील शिक्षक व अधीक्षक यांच्यासाठी राबविण्याबाबत शासनास सादर केला होता.

३ राज्यातील निवडक १०० शासकीय आश्रमशाळा/एकलव्य मॉडेल निवासी शाळा/ इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील किमान ५०० शिक्षक/अधिक्षक यांच्यासाठी कला शिक्षणाबाबत अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षण देणे या उद्देशातून आदिवासी विकास विभागाने कार्यकारी समिती व शासनाच्या मान्यतेने "Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashram schools" ही योजना प्रस्तावित केली . या प्रस्तावास जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal (Committee PAC) बैठकीमध्ये सदर योजना सन २०१९-२० करिता राबविण्यासाठी एकूण ४९.५० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भाधिन पत्र क्र १.अन्वये मंजुरी दिलेली आहे.सदर निधी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आला आहे.

४ आर्ट इंडिया फाउंडेशन हि एक सार्वजनिक धर्मादाय संस्था आहे. ही संस्था मुख्यत्वे शैक्षणिक व सामाजिक बाबींवर कामकाज करते. या संस्थेमार्फत भारतामध्ये विविध भागामध्ये कामकाज चालते. आर्ट इंडिया फाउंडेशन मार्फत khula aasmaan हि एक प्रमुख योजना राबविली जाते. खुला आसमान च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रकला , रेखाचित्र या संदर्भात प्रशिक्षण दिले जाते तसेच त्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरविणे व त्यांच्यामध्ये स्पर्धा घेणे. विद्यार्थ्यांसाठी वेब पेज ची निर्मिती करणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या कला गुणांना वाव देऊन स्पर्धात्मक वातावरणासाठी तयार करणे याबाबत खुला आसमानच्या माध्यमातून कामकाज होते . खुला आसमानाच्या माध्यमातून भारतातील ५०० गावे व शहरातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. सन २०१७ मध्ये पुणे येथे National Innovation Foundation अहमदाबाद व इतर संस्था यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या National Conference on Social Innovation **या कार्यक्रमात** social innovation project **म्हणून खुला आसमानला गौरविण्यात आले.. आदिवासी विकास विभागाने आर्ट इंडिया फाउंडेशन बरोबर २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये अप्पर आयुक्त ठाणे यांच्या कार्य क्षेत्रामध्ये ६ आश्रम शाळांमध्ये प्रायोजिक तत्वावर कामकाज केले आहे.** अशा नावाजलेल्या व या विषयाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या या संस्थेमार्फत "Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashram schools" ही योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजुरी देणे प्रस्तावित आहे

शासन निर्णय-

राज्यातील निवडक १०० शासकीय आश्रमशाळा/एकलव्य मॉडेल निवासी शाळा/ इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील किमान ५०० शिक्षक/अधिक्षक यांच्यासाठी कला शिक्षणाबाबत अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षण देणे या कार्यक्रमार्तंगत "Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashram schools" ही योजना आदिवासी विकास विभाग व आर्ट इंडिया फाउंडेशन यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु. ४९.५० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास ,नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३११५४२२८९६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.08.31 15:48:54 +05'30'

(संतोष जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव,आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे.
६) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक, ठाणे, अमरावती व नागपुर .
९) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१०) प्रतिनिधी, आर्ट इंडिया फाउंडेशन,पुणे
११) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

भारतीय संविधान अनुच्छेद २७५(१) अंतर्गत मंजूर योजना- सन २०१९-२०

परिशिष्ट-१ **(रुपये लाखात)**

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नाव</td><td>“Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashram schools "</td></tr>
<tr><td>२</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असणा-या शासकीय आश्रम शाळा ,एकलव्य निवासी शाळा व इंग्रजी माध्यम शाळा</td></tr>
<tr><td>३</td><td>वित्तीय तरतूद</td><td>
<table>
<tr><td>अ. क्र</td><td>वर्ष</td><td>योजना</td><td>निधी (लक्ष.रू)</td></tr>
<tr><td>१</td><td>२०१९-२०</td><td>Art India Foundation- Develop arts curriculum and training of teachers at Ashram schools</td><td>४९.५०</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>४९.५०</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>४</td><td>या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक</td><td>
एकूण खर्च -रु.४९.२५ लक्ष
सन २०१९-२० एकूण खर्च- ४९.२५ लक्ष
<table>
<tr><td>अ.क्र</td><td>बाब</td><td>युनिट</td><td>प्रती युनिट खर्च</td><td>एकूण खर्च</td></tr>
<tr><td>१</td><td>अभ्यासक्रम तयार करणे (व्हिडिओ, लिखित साहित्य व इतर)</td><td>१२५</td><td>२५,०००/-</td><td>३१,२५,०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>शिक्षक/अधीक्षक यांच्यासाठी आयोजित करण्यात येणा-या प्रशिक्षणाचा खर्च (प्रत्येक महिन्यातून दोन दिवस प्रशिक्षण)</td><td>२४</td><td>७५,०००/-</td><td>१८,००,०००/-</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण खर्च</td><td></td><td>४९,२५,०००/-</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>५</td><td>योजना राबवणारी यंत्रणा</td><td>सबंधित प्रकल्प अधिकारी व आर्ट इंडिया फाउंडेशन संस्था</td></tr>
<tr><td>६</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे ,नाशिक ,अमरावती व नागपुर</td></tr>
<tr><td>७</td><td>योजनेचा उद्देश/ हेतु</td><td>राज्यातील निवडक १०० शासकीय आश्रम शाळा ,एकलव्य निवासी शाळा व इंग्रजी माध्यम शाळा मधील किमान ५०० शिक्षक/अधिक्षक यांच्यासाठी कला शिक्षणाबाबत अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षण देणे.</td></tr>
</table>

८	योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती	**योजना राबविण्याची कार्य पद्धती खालील प्रमाणे असेल** १) सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आर्ट इंडिया फाउंडेशन हि संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल. २) योजनेच्या अनुषंगाने राज्यातील १०० शासकीय आश्रमशाळा/एकलव्य निवासी शाळा व इंग्रजी माध्यमशाळा यामधून किमान ५०० शिक्षक/अधीक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येईल. ३) आश्रमशाळांची निवड आयुक्त, आदिवासी विकास व अंमलबजावणी यंत्रणा यांनी एकत्रितपणे विद्यार्थी संख्येच्या आधारावर करावी. ४) आश्रमशाळा संख्या व शिक्षक/अधीक्षक संख्या यांमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांना राहतील. ५) योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणेमार्फत आश्रम शाळेतील शिक्षक/अधीक्षक यांच्यासाठी अभ्यासक्रम व पूरक साहित्य तयार केले जाईल. ६) प्रशिक्षणासाठी शिक्षक/अधीक्षक यांची निवड करताना कला शिक्षकांना व कलेची आवड असलेल्या इतर विषय शिक्षक/अधीक्षक यांना प्राधान्य देण्यात यावे. ७) प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या शिक्षक/अधीक्षक यांच्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेमार्फत दृष्य कला,अभिनय,नृत्य,विणकला, फॅब्रिक कला, हस्तकला या बाबत प्रशिक्षण दिले जाईल. ८) योजनेच्या अनुषंगाने मध्यवर्ती ठिकाणी प्रत्येक महिन्यातून एक असे एकूण १२ प्रशिक्षण घेतले जातील. ९) प्रत्येक प्रशिक्षणाचे स्थान, दिनांक,वेळ याबाबत माहिती अंमलबजावणी यंत्रणा प्रत्येक महिन्याच्या सुरूवातीला सबंधित शाळांना आयुक्त, आदिवासी विकास यांच्या मार्फत कळवतील. १०) प्रत्येक प्रशिक्षणाचा कालावधी हा २ दिवसाचा असेल. ११) निवडल्या गेलेल्या शाळेतून मुख्याध्यापक दोन दिवसाच्या प्रशिक्षणासाठी प्रत्येक दिवशी वेगवेगळे २ शिक्षक /अधीक्षक यांचे नामनिर्देश करतील. १२) नामनिर्देश झालेल्या शिक्षक/अधीक्षक यांनी त्या प्रशिक्षणामध्ये भाग घेऊन २ दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण करून मुख्याध्याध्यापकास अहवाल सादर करावा. १३) मागील प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेल्या बाबी व सदर बाबी शाळा स्तरावर राबविण्यासाठी केलेले नियोजन या बाबतीत सबंधित मुख्याध्यापक नोट तयार करून नामनिर्देश केलेल्या शिक्षक/अधीक्षक यांच्यामार्फत प्रत्येक प्रशिक्षणामध्ये सादर करतील. तसेच या बाबत केलेल्या कार्यवाहीचे फोटो, त्यासंबंधीची नोट व करण्यात येणारे नियोजन याबाबत माहिती आर्ट इंडिया फाउंडेशन तसेच प्रकल्प अधिकारी यांना सादर करतील.

९	**योजनेच्या अटी व शर्ती**	१) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल. २) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल. ३) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा. ४) योजनेच्या अनुषंगाने देण्यात येणारे प्रशिक्षण व त्या बाबतची कार्यवाही या बाबतची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची राहील. ५) योजनेच्या अनुषंगाने १२ प्रशिक्षण घेणे अंमलबजावणी यंत्रणेला बंधनकारक राहील. ६) योजनेच्या अनुषंगाने निवडल्या गेलेल्या प्रत्येक आश्रम शाळेचा/एकलव्य निवासी आश्रम शाळेचा नामनिर्देश केलेला शिक्षक/अधीक्षक यांना प्रशिक्षण घेणे बंधनकारक असेल. सदर प्रशिक्षणामध्ये सबंधित शिक्षक/अधीक्षक हे वेळेवर उपस्थित रहावे या बाबत कार्यवाही मुख्याध्यापक यांनी करावी. ७) शिक्षक/अधीक्षक यांनी प्रशिक्षण घेतल्या नंतर त्या बाबतची कार्यवाही व सदर प्रशिक्षणात शिकविलेल्या बाबी यांचे नियोजन शाळेच्या स्तरावर करणे बंधनकारक राहील. ८) प्रशिक्षणात शिकविल्या गेलेल्या बाबी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शाळेच्या स्तरावर आठवड्यातून एकदा किमान एक तास राखीव ठेवून राबविण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील. ९) योजनेच्या अनुषंगाने प्रशिक्षण देणे, प्रशिक्षक नियुक्त करणे, प्रशिक्षणाचे साहित्य तयार करणे व वितरित करणे या बाबतचा खर्च अमलबजावणी यंत्रणेनी करावा. १०) प्रशिक्षणासाठी स्थळ निश्चिती व त्या बाबतचा खर्च , राहण्याचा, जेवण व इतर अनुषंगिक खर्च करणे व योजनेसाठी समन्वय अधिकारी नेमण्याची जबाबदारी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांची असेल. प्रशिक्षणार्थींना नियमानुसार अनुज्ञेय प्रवास खर्च शालेयस्तरावर अदा करण्यात येईल. ११) योजनेच्या अनुषंगाने प्रशिक्षणावेळी चित्रफीत तयार करण्याची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची राहील. १२) योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी आयुक्त,आदिवासी विकास व शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. १३) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. १४) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व प्रशिक्षण Photographs हे

		www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील. १५) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल.
१०	**सनियंत्रण व मूल्यमापन समिती**	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापना करीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.** १.आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक **-अध्यक्ष** २. सबंधित अप्पर आयुक्त,आदिवासी विकास **-सदस्य** ३ . सबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्रकल्प **- सदस्य** ४.प्रतिनिधी ,आर्ट इंडिया फाउंडेशन **-सदस्य** ५. कला क्षेत्रातील नामवंत व्यक्ति **-आमंत्रित सदस्य** ६.उपायुक्त शिक्षण,आयुक्तालय नाशिक **-सदस्य सचिव** ➢ योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल शासनास / आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात याव तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.
११	**योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी**	शासन निर्णय निर्गमित होऊन निधिचा पहिला हप्ता वितरित झाल्यापासून पुढील ०१ वर्ष
१२	**निधी वितरणाची कार्य पद्धती**	**सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे.** १) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी अमलबजावणी यंत्रणेची असेल. योजनेसाठी इतर कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणेनी ध्यावी. तथापि , या प्रकल्पासाठी काही तातडीचा खर्च उद्धभवल्यास प्रस्तावास मंजूरी दिलेल्या बाबींमधील खर्चामध्ये बदल करून प्रस्तावाच्या मंजूर केलेल्या रकमेच्या मर्यादेत सदर खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार नियंत्रक अधिकारी यांना राहील. २) सदर योजनेचा निधी हा आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांच्या मार्फत अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल.

		३) शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आयुक्त,आदिवासी विकास ,नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेला कार्यारंभ आदेश देऊन प्रकल्पासाठी मंजूर रकमेतून ५० टक्के रक्कम अदा करतील . ४) सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल . ५) प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ०६ प्रशिक्षण झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर पहिल्या वर्षाची पुढील ३० टक्के निधी वर्ग करण्यात येईल. ६) मंजूर झालेल्या निधीतून उर्वरित २० टक्के निधी योजना यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या नंतर तसेच कार्य पूर्णता प्रमाणपत्र सदर केल्या नंतर मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अभिप्राय नुसार अंमलबजावणी यंत्रणेस वर्ग केला जाईल . ७) प्रशिक्षणासाठी स्थळ निश्चितीबाबतचा खर्च , प्रशिक्षणार्थींच्या राहण्याचा, जेवण व इतर अनुषंगिक बाबींचा खर्च आश्रमशाळा समूह योजनेतून करण्यात यावा. ८) योजनेच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्यात येणारे कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील . ९) योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी अंमल बजावणी यंत्रणेची राहील.
१३	**योजनेची फलनिष्पती**	राज्यातील शासकीय आश्रमशाळा/एकलव्य निवासी शाळा व इंग्रजी माध्यम शाळांमधील शिक्षक/अधिक्षक हे कला शिक्षणाबाबत प्रशिक्षित होतील.